स्थायी समितीच्या **मंगळवार दिनांक 09–02–2016** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 6. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 7. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 8. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 9. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 10. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 11. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 12. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 13. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 14. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 2. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 611 :– प्रभाग क्र. 71 – ब अंतर्गत लोकसेवा नगर येथील मुख्यरस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त मे. M/s. L.C. Gurubaxani यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा राशी रूपये ४९९९४९६/– च्या दरापेक्षा ३.५१ प्रतिशतने अधिक दराची **रूपये** ५१७४९७८/– (अक्षरी एकावन लक्ष चौ–याहत्तर हजार नऊशे अठ्ठयात्तर रूपये फक्त) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 612</u>:– प्रभाग क्र. 69 – अ अंतर्गत प्रतापनगर (लक्ष्मी किराणा) ते कोलते यांचे घर, फ्रेंड्स कॉलोनी चौक पर्यंत मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त मे. M/s. S.K. Gurubaxani यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा राशी रूपये ३३,१३,३२६/– च्या दरापेक्षा ३.५५ प्रतिशतने अधिक दराची **रूपये ३४३०९४९**/– (अक्षरी चौतीस लक्ष तीस हजार नऊशे एकोणपन्नास रूपये फक्त) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 613</u> :– **प्रभाग क्र. ५२–अ** अंतर्गत धरमपेठ व शंकर नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी **मे. आर. एम. दयारमानी** यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा ३.७५ **प्रतिशत अधिक दराची रू. ५१,८६,८९५/–** दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 614</u> :– प्रभाग क्र. ६२ अंतर्गत न्यु प्रेरणानगर, श्री महालक्ष्मी नगर व सुर्योदय नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण ५ निविदाकारा पैकी मे. डी.सी. गुरूबक्षाणी यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दराच्या निविदा राशी रू. ३०,३२,०८७/– रकमेच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 615</u> :– प्रभाग क्र ७ ब आदिवासी सोसायटी डोये ले आऊट, शिवाजीनगर भाडेकरू सोसायटी, कडू ले आऊट, साईबाबा सोसायटी, मलवार ले आऊट, झिंगाबाई टाकळी येथे रस्त्याचे डांबरीकरण्याचे कामास्तव प्राप्त निविदा पैकी मे. आर. एम. दयारमाणी यांची निन्मतम निविदा मूळ प्राकलनीय दरापेक्षा ३.७५% अधिक दराची निविदा रू. ५१,१५,४०९/– ( एकावन लक्ष पंधरा हजार चारशे नऊ फक्त ) पैकी रू. ३०,००,०००/– पर्यंत काम करण्याकरीता मंजुरी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 616</u> :– प्रभाग क्र. 20–अ, येथील लष्करीबाग व भोसलेवाडी येथे नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त 09 निविदापैकी मे. फुलसींग बाम्होरे यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.10 टक्के कमी दराची रू. 25,71,113/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 617</u> :— प्रभाग क्रं. ७२ — क अंतर्गत जयताळा मांतग मोहल्ला ते दाते ले—आऊट पुला पर्यंत सी.सी. रोड तयार करण्याचे कामास्तव विभागा द्वारे तयार करण्यात आलेल्या रू.राशी ५३,६७,३८६/— या रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करून निवीदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. ६७९ (A 42001470511) राष्ट्र संत तुकडोजी महाराज रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत (सिमेंट कॉक्रेटचे रस्ते निर्माण) तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 618</u> :— प्रभाग क्रं. ६७ अ येथील जयवंत नगर येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण ५ निविदाकारांपैकी मे. पी.के. नगरारे कंन्स्ट्रक्शन यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ३.५० टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. ३१,८१,५८५ /— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 619</u>:— प्रभाग क्र. 27 कॉटन मार्केट चौक ते आग्याराम देवी चौका पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी में. एस. के. गुरूबक्षाणी हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 19.31 टक्के अधिक दराची निविदा रूपये 35,77,904/— ( रूपये पसत्तीस लक्ष सत्यात्तर हजार नऊशे चार रूपये फक्त ) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्यात आलेली असुन कार्यादेश क्र. 73/RD दिनांक 16/12/2014 अन्वये कर्यादेश देण्यात आले होते. तथापी सदर्हुन रस्त्याच्या कामाचा C. C. Road Phase-II या योजनेत अंर्तभाव केलेला असल्यामुळे या कामा ऐवजी मौका बदल करून इमामबाडा रोड येथील डालडा फॅक्टरी चौक ते सुभास रोड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरीता त्याच कंत्राटदारां मार्फत 18% टक्के अधिक दर 35,38,619/— ( रूपये पसत्तीस अडतीस हजार सहाशे एकोणविस रूपये फक्त ) हया दरावर कामाचा मौका बदल करण्याच्या प्रस्तावासह मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन 19.31 टक्के ऐवजी 16 टक्के करण्याच्या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 620</u> :— नागपूर महानगर पालिकेच्या हॉट मिक्स प्लान्ट विभागाकरीता रस्ते बांधकाम साहित्य खरेदी करण्याच्या कामाकरीता मे. अल्ताफ अहमद यांनी सादर केलेली प्राकलनिय दरांपेक्षा 5.55**%** अधिक दराची रु. 21097944.00 राशीची निम्नतम निविदा स्विकृत करुन निविदेस मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 621</u> :— प्रभाग क्रं. ६३, हुडकेश्वर रोड ते आर्शिवाद नगर शहंशाह चौक पर्यंत रस्त्याचे सिमेन्टीकरण करण्याचे कामास्तव रू. १,१६,५२,७६२/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे तसेच पद क्र. A४२००१४७०५११ अंतर्गत या कामास्तव

तरतूद उपलब्ध करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 622</u>:— म.न.पा. मालकीचे टक्कामोरे मार्केट, सतरंजीपुरा झोन क्र. 7 कार्यक्षेत्रातील दुसऱ्या माळ्यावर असलेले 73.84 चौ. मी. क्षेत्रफळाचे टिनाचे शेड/हॉल बऱ्याच वर्षापुर्वी गांधीबाग झोन क्र. 6 व्दारा बांधण्यात आलेला आहे. सदरहु शेड/हॉल रिकामा आहे. सदरहु शेड/हॉल चा वापर करणेकरीता तिन अर्जदारांनी अर्ज सादर करून मागणी केलेली आहे. तिन अर्जदारा पैकी श्री. नरेंद्र नथ्थुजी कर्णेवार, हे टक्कामोरे मार्कट येथील एका दुकानाचे परवानेधारक आहेत. संबंधीत सदरहु हॉल/शेड करीता म.न.पा. ठरविल त्या दरानुसार व अटि व शर्ती नुसार शेड/हॉल वापराकरीता देण्याची मागणी केलेली आहे. उर्वरीत दोन अर्जदार शासकीय जनसमस्या मुक्ती कॉंग्रेस व क्रांतीसुर्य संघटन यांनी निशुल्क भाडे तत्वावर शेड/हॉल ची मागणी केलेली आहे.

मा. श्री. दिपक मोहन पटेल, नगरसेवक, प्रभाग क्र. 27 (अ) व सदस्य स्थायी समिती, यांनी दि. 15/04/2015 ला मा. अध्यक्ष, स्थायी समिती, म.न.पा. यांना पत्र देवुन नियमानुसार संबंधीत अर्जदार श्री. नरेंद्र नथ्थुजी कर्णेवार, यांना भाड्याने सदरहु हॉल/शेड देण्याची शिफारस केलेली आहे. मा. अध्यक्ष, स्थायी समिती, म.न.पा. यांनी सदरहु शिफारस पत्रावर योग्य प्रस्ताव स्थायी समिती समोर त्वरीत सादर करणेचे निर्देश दिलेले आहेत. ह्या अनुषंगाने बाजार विभाग, म.न.पा. व्दारा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम 1949 चे **कलम 79 (ड)** अन्वये मा. आयुक्त, महानगरपालिकंच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता चालु बाजार किंमती पेक्षा कमी असणार नाही असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला आकारून मालमत्तेचा विनियोग करू शकेल, अशी तरतुद आहे.

टक्कामोरे मार्केट, येथील गाळे यापुर्वी अग्रिम जमा राशी योजनेच्या तहत आवंटन करण्यात आलेले आहे. म्हणुन सदरहु प्रकरणात देखील अर्जदाराकडुन अग्रिम जमा राशी प्राप्त करून घेण्याबाबत विचार करावा लागेल.

टक्कामोरे मार्केट, मधील सदरहु शेड/हॉल चे क्षेत्रफळ 73.84 चौ.मी. असुन नगर रचना विभाग, म.न.पा. यांनी त्याकरीता भाडे रू. 26,582/— प्रति महिना मुल्यांकीत केलेले होते. म्हणुन विषयाचे प्रारूपासह नस्ती मा. सभापती, स्थायी समिती, म.न.पा. यांचे कडे पाठविण्यात आली असता, मा. सभापती, स्थायी समिती, म.न.पा. यांनी प्रकरणात सन 1980 पासुन इमारतीची Dipression Value (अवक्षण मुल्य) काढण्याकरीता नस्ती पुन्हा मा. सहा. संचालक, नगर रचना विभाग, म.न.पा. यांचे कडे फेर सादर करण्याचे स्थायी समितीचया दि. 31/07/2015 रोजी भरलेल्या सभेच्या अहवालातुन घेतलेला उतारा मधील ठराव क्र. 137 दि. 31/07/2015 मध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे नस्ती पुन्हा विभागातर्फे दि. 12/08/2015 रोजी स.स.न.र, म.न.पा. यांचे कडे पाठविण्यात आली होती.

यावर मा. सहा. संचालक, नगर रचना विभाग, म.न.पा. यांचे सन 2015 चे मुल्यांकन दर प्राप्त झालेले असुन, सदरहु इमारतीचे बांधकामाचे मुल्य रू. 14,76,800/— प्राप्त झालेले असुन, यावर 36 वर्षाचे अवक्षण मुल्य घसारा 60 % दराने कमी केले असता, रू. 8,86,080/— ऐवढी प्राप्त झालेली आहे. म्हणुन सदर प्रकरणात अर्जदारास अग्रिम जमा राशी योजनेच्या तहत उक्त हॉल/शेड द्यावयाचे झाल्यास, रू. 8,86,080/— हि अग्रिम जमा राशी गृहीत धरून डिपॉझीट घेण्यात येईल.

सदर प्रकरणात 12 महिन्याच्या कालावधी करीता रू. 4,41,268/— वार्षीक भाडे व रू. 36,772/— मासीक भाडे आकारणे बाबत मा. सहा. संचालक, नगर रचना विभागाकडुन अहवाल प्राप्त झालेला आहे.

उपरोक्त तरतुदिंचा वापर करून व म.न.पा. आर्थीक हित जोपासुन टक्कामोरे मार्केट, येथील 73.84 चौ.मी. क्षेत्रफळाचा हॉल/शेड चा वापर करणेकरीता जो अर्जदार आजच्या बाजार मुल्य व भाडे पेक्षा कमी असणार नाही अशा बाजार मुल्य व भाडे मुल्यावर अग्रिम जमा योजने अंतर्गत वापराकरीता घेणेस तयार असेल अशा अर्जदाराच्या मागणीबाबत निर्णय घेण्यास्तव ठराव क्र. 137 दि. 31/07/2015 मध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे तसेच मा. आयुक्त, म.न.पा. यांचे दि. 15/01/2016 रोजीचे निर्देशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम 1949 चे **कलम 79 (ड)** अन्वये कार्यवाही करणेस्तव फेर सादरी करणासह निर्णय घेणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 332 'अ' व 'क' प्रमाणे श्री. नरेंद्र नथ्थुजी कर्णेवार या अर्जदारास रु. 15,000/– प्रति महिना भाडे या तत्वावर तिन वर्षाकरिता देण्यात येते तसेच भाडे मुल्यांमध्ये दरवर्षी 10 टक्के वाढ करण्याच्या अटी व शर्ती सह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 623:–** प्रभाग क्र. 36 अ मधील भांडेवाडी प्रजापती नगर येथील रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्यास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. अमृता कन्स्ट्रक्शन यांची 2.00 टक्के अधिक दराची रु. 31,86,220/– रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A22001330802 मधून आर्थिक वर्ष 2015–16 मध्ये रु. 31,25,000/– राशीची तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

**ठराव क्रमांक 624 :–** आरोग्य विभागाच्या अंतर्गत शहरातील दहा झोनच्या सार्वजनिक शौचालये व मुत्रीघर (पक्के व फायबर) यांची यांत्रीकी पध्दतीने साफ सफाई करण्याची निविदा व निविदा होईस्तोवरच्या मान्यतेसाठी स्थायी समिती ठराव क्रं. १३६ दि. ३१/०७/२०१५ अन्वये समितीद्वारे (अ) संदर्भात वेगळा प्रस्तावानुसार निविदा प्रक्रिया १५ एप्रिल २०१५ पासून नविन काढण्यांत आलेल्या निविदास मंजूरीची प्रक्रिया पुर्ण होईस्तोवर अंदाजीत खर्च रुपये २,०३,६९,३९८/– अपेक्षित राहील. सदर खर्च आय व्यय पद क्रं. A२४१०१२३१६०१ मधून तरतुद उपलब्ध करुन देण्यास व मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 625 :–** शांतीनगर पोलिस स्टेशन करिता महानगरपालिकेच्या मालकीची शांतीनगर शाळेच्या परीसरातील रिक्त असलेली व्यायामशाळा आराजी **८८.८३ चौ.मी.**, उर्दु शाळेची एकमजली ईमारत आराजी **२२३.१६ चौ.मी.** आणि पश्चिमेकडील शाळेची रिक्त इमारत आराजी **४८.९७ चौ.मी.** या तिनही इमारती करिता रु. ९७,१९५/– प्रती माह दराने ११ महिन्याकरीता एकुण **रु. १०,६९,१४५/–** (रुपये दहा लाख एकोणसत्तर हजार एकशे पंचेचाळीस फक्त) वसुल करुन ११ महिन्याचे अस्थायी भाडेतत्वावर MMC Act 1949 चे कलम ७९ (c), (d) अन्वये खालील अटीअधिन देण्याचा प्रश्न विचारात घेऊन म.न.पा. सभागृहाची मंजूरी मिळेल या पूर्व धारणेवर एकमताने मंजूरी प्रदान करण्यांत येते तसेच,

अटी व शर्ती :–

१) उपरोक्त तिनही इमारतीचे एकुण क्षेत्रफळ **३६०.९५ चौ.मि.** असुन नगररचना दरानुसार इमारतीचे भाडे रु ९७,१९५/– (रुपये सत्यानव हजार एकशे पंच्यानउ फक्त) प्रती माह प्रमाणे राहील. त्यानुसार ११ महिन्याचे एकुण भाडे रु. १०,६९,१४५/– (रुपये दहा लाख एकोणसत्तर हजार एकशे पंचेचाळीस फक्त) आगाऊ म.न.पा.त जमा करावे लागेल.

२) नागपूर महानगरपालिकेस सदर ईमारतीची आवश्यकता भासल्यास ३० दिवसांचे पुर्व सुचनेसह जागा परत घेण्यात येईल.

३) पोलीस स्टेशनचे कार्यप्रणाली मुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कार्यात अडथळा निर्माण होणार नाही याकरिता दोन्ही इमारती दरम्यान तात्पुरत्या स्वरुपाचे दृष्टी प्रतिबंधक (Vision Barrier) उभारण्यात यावे व वेगळा प्रवेश मार्ग बनविण्यात यावे.

४) इमारतीच्या बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरबदल करता येणार नाही

५) विद्युत, पाणी व इतर व्यवस्थेची जबाबदारी धारकाची राहील.

६) सदर जागेचा उपयोग फक्त शांतीनगर पोलीस स्टेशन करीता राहील.

७) उपरोक्त बाबत कोणत्याही निर्णयासंबंधीचा संपूर्ण अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांचेकडे सुरक्षित राहील व धारकास बंधनकारक राहील.

८) स्थायी समीतीचे मंजुरीनंतर सदरील प्रस्ताव महानगरपालीका सभागृहाचे मंजुरीकरीता सादर करण्यात येईल.

वरील अटी व शर्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 626:– प्रभाग क्र. 32 अ दानागंज परिसर येथे आर.के.फ्लोअर मील ते भुखंड क्र. 3 व श्री. मोटवानी ते हरिहर अपार्टमेंट पर्यंत रस्त्याच्या विकास करण्याचे कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. प्रेमचंद राचुमल यांची 9.79 टक्के कमी दराची रु. 4236528/– रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्यासह सन 2015–16 या आर्थिक वर्षात पद क्र. A2200133802 अंतर्गत तरतूद उपलब्ध करुन देण्यास प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 627:– प्रभाग क्र. 32 ब सतनामीनगर येथे श्री. अमृते ते श्री वाघ व श्री. लक्षणे ते श्री. बोरकर यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्रापत निम्नतम निविदाकार मे. संतोष आर. खरपकर यांची 17.89 टक्के कमी दराची रु. 27,67,868/– रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्यासह सन 2015–16 या आर्थिक वर्षात पद क्र. A42001470511 अंतर्गत तरतूद उपलब्ध करुन देण्यास प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 628 :– प्रभाग क्र. 32 ब भाऊराव नगर येथे श्री. खोब्रागडे ते श्री. अरोरा यांचे घरापर्यंत सिमेट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. संतोष आर. खरपकर यांची 17.89 टक्के कमी दरांची रू. 27,39,308/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्यासह सन 2015–16 या आर्थीक वर्षात पद क्र. A42001470511 अंतर्गत तरतूद उपलब्ध करून देण्यास प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 629</u>:— स्थायी समिती ठराव क्र. ३४३ दिनांक १७.१२ २०१५ अन्वये नागपूर शहरातील सिमेंट काँक्रीट रस्ते — फेज ।। प्रकल्पातंर्गातील समाविष्ट रस्त्यांच्या कामाच्या मंजूर २२ पॅकेजनिहाय मागविण्यात यावयाच्या निविदेकरीता प्रति रूप (मॉडेल) निविदा प्रपत्रास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे व त्यानुसार मंजूर करण्यात आलेल्या अटी व शर्ती मध्ये काही सुधारणा करावयाचे अधिकार अधिक्षक अभियंता, मनपा यांना दिले आहे. त्यानुषंगाने पुढील प्रमाणे प्रस्तावास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन.

१. निविदा सुचना क्र. ३०७/पीआर/दिनांक १८.१२.२०१५ अन्वये मागविण्यात आलेल्या पॅकेज नं. १, २, ४, ५, १७ व १८ या प्रमाणे एकूण ०६ पॅकेजेस च्या दिनांक १९.०१.२०१६ रोजी झालेले आहे. प्री बीड मिटींग मधील प्राप्त सुचनाच्या अनुषंगाने, मा. अधिक्षक अभियंता, मनपा यांनी अनुमोदीत केलेल्या परिशिष्ट अ (नस्तीमध्ये उपलब्ध आहे.) मध्ये नमूद निविदा अटी व शर्ती मधील सुधारणा स्थायी समिती समक्ष नोंदीस्तव ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन एकमताने नोंद घेतली.
२. निविदा सुचना क्र. ३३१/पीआर/दिनांक ११.०१.२०१६ अन्वये मागविण्यात आलेल्या पॅकेज नं. ३, ६, ८, ११, २० व २१ या प्रमाणे एकूण ०६ पॅकेजेस च्या दिनांक २९.०१.२०१६ रोजी झालेली प्री बीड मिटींग मधील प्राप्त सुचनाच्या अनुषंगाने, मा. मुख्य अभियंता यांचेशी सांगोपांग चर्चा होवून तयार करण्यात आलेल्या सि.एस.डी. व पूर्वी मान्य निविदा प्रपत्रात करावयाच्या प्रस्तावित बदल व सुधारणेस (परिशिष्ट ब प्रमाणे) मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

नागपूर शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ते — फेज II या प्रशासनाद्वारे काढण्यात आलेल्या कामांच्या निविदेस अल्प प्रतिसाद आला असे या स्थायी समितीच्या निर्दशनास आले आहे.

यापूर्वी ज्या नमुद अटी व शर्ती प्रमाणे निविदा बोलाविल्या त्या परिशिष्ट ‘अ’ मध्ये नमुद आहे. त्यामध्ये बदल करण्याचे प्रशासनाने स्पष्ट केले असून परिशिष्ट ‘ब’ मध्ये नमुद केलेले आहे.

निविदा प्रक्रियेत अधिक निविदाकारांचा / कंत्राटदारांचा सहभाग होऊन स्पर्धात्मक निविदा प्राप्त होण्याच्या दृष्टीने व प्रस्तावित कामे अधिक जलद गतीने तसेच नियोजीत कालावधीत पूर्ण व्हावी या अनुषंगाने प्रशासनाने जे बदल सुचविलेले आहे. त्यासह अनुक्रमांक 2 मधील स्पष्ट केलेल्या परिशिष्ट ‘ब’ मध्ये दुरुस्ती व बदलास खालील प्रमाणे एकमताने ही स्थायी समिती मंजूरी प्रदान करते.

परिशिष्ट ‘ब’ मधील दुरुस्ती ——

Sr. No. 4, Tendar Clause, 11(viii) Eligibility Criteria, स्तंभ क्र. 5 मधील दुरुस्ती ——

This clause shall be read as “The tenderer shall have experience of successful completion of laying of PQC of CC M-35 or higher grade for the quantity equal to 30%

(i.e. quantity as mentioned in the each bid document) of quantity put to tender for PQC item separately for each tendered work. For purpose of verification of this compliance, the aggregate of separate works carried out in any one year of past five years starting from year 2010-11 by the tenderer complying with other stipulations will be considered. The certificate for quantity of PQC, so produced shall be obtained from the officer not below the rank of Executive Engineer. (Completed Work Carried out in Govt./Semi Govt. Bodies such as MHADA, MSEB, MIDC, CIDCO etc. or 'B' Class Municipal Corporations will only be considered.)

OR

For NMC registered contractors only who had the past experience of successful completion of laying of PQC of CC M-45 or higher grade of works carried out for NMC (Nagpur Municipal Corporation, Nagpur) OR NIT (Nagpur Improvement Trust, Nagpur) of the quantity equal to 30% (i.e. quantity as mentioned in the each bid document) of quantity put to tender for PQC item separately for each tendered work in any previous years shall also be considered.

For purpose of verification of this compliance, the certificate for quantity of PQC so produced shall be obtained from the officer not below the rank of Executive Engineer.

Sr. No. 12, Tendar Clause, 11(iii) Eligibility Criteria, स्तंभ क्र. 5 मधील दुरुस्ती

The clause shall be read as “And shall have successfully completed the Road work project previously in last five years starting from year 2010-11 i.e. construction of Road works (Concrete/BT) of the Minimum value equal to 30% of the amount put to tender or Rs. 5.00 Crore whichever is more. The financial figures can be escalated by 10% per year (Multiplying factor as specified in qualification Form-2 as amended at Sr.No.5) to bring them to year 2014-15 price level. (Completed Work Carried out in Govt./Semi Govt. Bodies such as MHADA, MSEB, MIDC, CIDCO etc. or 'B' Class Municipal Corporations will only be considered.) remaining Tender Condition shall stand unamend.

**OR**

For NMC registered contractors who has past experience of successful completion of cement concrete road work for NMC (Nagpur Municipal Corporation, Nagpur) OR NIT (Nagpur Improvement Trust, Nagpur) in any previous years shall also be considered .

Sr. No. 10, Tendar Clause, 2 Award Criteria, स्तंभ क्र. 5 मधील दुरुस्ती

The owner will award the contract to the Bidder whose Bid has been determined to be substantially responsive to the Bidding document and who has offered the lowest evaluated Bid Price, provided that such Bidder has been determined to be qualified to perform the contract satisfactorily. Bidder may participate in one or more packages. However, although the bidders are eligible to participate in competitive bidding in accordance with this tender document for any or all the packages, maximum two

packages shall be awarded to one bidder with the list of machinaries mentioned in NIT out of total 12 (twelve) packages in Tender vide notice No. 307 dated 28/12/2015 and No. 331 dated 12/01/2016 advertised so far under this project of construction of concrete roads Phase-II in Nagpur city. And maximum 4 (four) packages out of total 12 (twelve) packages in Tender vide notice No. 307 dated 28/12/2015 and No. 331 dated 12/01/2016 advertised so far under this project of construction of concrete roads Phase-II in Nagpur city shall be awarded to one bidder if the machinery available with bidder as mentioned in clause No.11 Eligibility Criteria (v) and (XI-1) clause as per CSD-1 is twice or more times the required machinery (except batchmix concrete plant) as mentioned in the tender document, which shall be owned by him and shall have executed additional quantity of PQC in M-35 grade and above than the qualifying quantity of bid11(viii) as modified in corrigendum/Addendum/Errata) subject to condition that his balance qualifying quantity i.e. qunatity after deducting in the qualifying quantity of the tender for which he is qualified as lowest bidder shall be considered for qualification.

**ADDENDUM / ERRATA** मधील दुरुस्ती ——

Sr. No. 7, Tendar Clause, 2.4 e) Programme Schedule, स्तंभ क्र. 5 मधील दुरुस्ती

Penalty: The penalty for disproportionate progress for the period excluding the period loss for the reasons beyond the control of contractor against clause 2 of GCC shall be as listed below-

1) Upto Rs. 10,000/- per day for first 15 Days,

2) Upto Rs. 20,000/- per day for next 15 Days,

3) Upto Rs. 50,000/- per day for next 15 Days,

4) Upto Rs. 1,00,000/- per day for next 15 Days and for further period the amount of penalty as decided by the Engineer -in-charge subject to maximum 10(Ten) percent of the estimated cost put to tender and further action will be taken as per condition of contract. Also if the penalty is continued for more than 50 days, then the agency shall be barred from any participation in any tender in Nagpur Municipal corporation for next 1(one) year.

If the Chief Engineer, NMC satisfies the progress of the work subsequently achived as per the clause 2 of CC, the penalty so imposed shall be released.

याप्रमाणे झालेले बदल व दुरुस्तीच्या अनुषंगाने आवश्यक व बंधनकारक कागदपत्राची सुची प्रशासनाने तयार करावी अशी ही स्थायी समिती निर्देश देते.

3. सिमेंट रोड प्रकल्प फेज—।। अंतर्गातील तृतीय निविदा सुचना क्र. ३५६/पीआर/दिनांक २९.०१.२०१६ अन्वये मागविण्यात आलेल्या पॅकेज नं. ७, ९, १०, १२, १६ व १९ या प्रमाणे एकूण ०६ पॅकेजेस व उर्वरीत सर्व कामांचे निविदा अटी व शर्ती मधील वर उल्लेखीत १ व २ प्रमाणे सि.एस.डी.ला मान्यता प्राप्त झाल्यास या निविदेतील मुळ प्रतिरूप अटी व शर्ती मध्ये याप्रमाणे बदल करून निविदा मागविणे तथा

या निविदेच्या प्री बीड मिटींग मधील प्राप्त सुचनाच्या अनुषंगाने काही सुधारणा करावयाच्या झाल्यास याबाबतचे अधिकार मा. मुख्य अभियंता, मनपा यांना प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मुख्य अभियंता यांना काही सुधारणा किंवा बदल करावयाचे झाल्यास मा. स्थायी समिती अध्यक्ष यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील या सूचनेसह मुख्य अभियंता यांना अधिकार प्रदान करण्यास एकमताने मंजूरी प्रदान करते.

ठराव क्रमांक 630:— प्रभाग क्रं. ६७ येथील आर्दश वस्ती सुधार योजने अंतर्गत ओकांरनगर येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण, आय ब्लॉक पेव्हमेंट आणि पावसाळी नालीचे बांधकाम करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण ४ निविदाकारांपैकी मे. फोनिक्स इंजिनियरींग यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ३.५० टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. १,४०,८२,८४१ /— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 631:— प्रभाग क्रं. ६७ ब येथील जयदुर्गा टाईल्स ते गुरूदेव नगर पर्यंत रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण ४ निविदाकारांपैकी मे. पी.के.नगरारे यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ३.५० टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. ३५,५६,१९० /— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 632 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर